ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-V MAY 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# वसतिगृहात राहात असलेल्या विद्यार्थिनींना येणा—या अडचणी

प्रा.डॉ. माणिक विजापुरे

एम.ए., एम.एड., एम.फिल.,पीएच.डी.

महावीर महाविद्यालय,कोल्हापूर

## प्रस्तावना :—

उच्च शिक्षणासाठी परगावी जाण्याचा निर्णय घेतल्यास विद्यार्थिनींना निवासव्यवस्था विचारात घ्याव्या लागतात. त्यापैकी महाविद्यालयांनी चालविलेली वसतिगृहे ही अधिक सोईची वाटतात.

वसतिगृहात राहात असलेल्या विद्यार्थिनींच्या अडचणी जाणून घेण्याच्या हेतूने एक प्रश्नावली तयार केली. 15 वसतिगृहात राहात असलेल्या विद्यार्थिनींना देण्यात आली. विद्यार्थिनींची निवड सुगम यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली. प्रश्नावलीत बंदिस्त व मुक्त स्वरूपाचे प्रश्न होते.

नोंदविलेल्या प्रतिसादावरून 97% विद्यार्थिनींच्या महाविद्यालयांची वसतिगृहे आहेत. तीन विद्यार्थिनींनी अन्य संस्थांच्या वसतिगृहात प्रवेश घेतला होता. या विद्यार्थिनींशी चर्चा करताना असे आढळून आले की, या विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी परगावी पाठविण्याचा निर्णय पालकांनी पैशा अभावी उशीरा घेतला होता. महाविद्यालयाच्या वसतिगृहातील उपलब्ध जागांची संख्या मर्यादित असल्याने या विद्यार्थिनींना अन्य संस्थांच्या वसतिगृहात निवासाची व्यवस्था करावी लागली होती.

विद्यार्थिनींना वसतिगृहात राहताना कोणत्या अडचणी जाणवतात हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नांची योजना करण्यात आली होती.

- **विद्यार्थिनींनी दिलेल्या प्रतिसादावरून विद्यार्थिनींना वसतिगृहात राहत असताना खालील अडचणी जाणवतात.**

1. अपूरा उजेड, कोंदट हवा
2. अपूरा पाणी पुरवठा.
3. स्वच्छतागृहे, स्नानगृहे यांची अस्वच्छता.
4. मेटूनचा मनमानीपणा
5. इतर विद्यार्थिनींचा दंगा
6. विशिष्ट खानवळीमधून जेवण घेण्याची सक्ती होते.
7. खोलीतून वस्तू चोरीला जातात.
8. मेटून अविश्वास दाखवितात.
9. वसतिगृहातील मुली व्यसनी/ स्वैर आहेत.

**वरील प्रतिसादातील अडचणी श्रेणीबद्ध स्वरूपात पुढील प्रमाणे मांडता येतील**

**विद्यार्थिनींना येणा–या अडचणी.**

| अ.क. | अडचणी | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| 1 | भौतिक सुविंधाबाबत अडचणी | 87.69% |
| 2 | इतर विद्यार्थिनीबाबतच्या अडचणी | 62.00% |
| 3 | अधिक्षिकांबाबत अडचणी | 55.00% |
| 4 | खोलीतील वस्तू चोरीला जातात | 17.00% |

वसतिगृहात रॅगिंग होते काय ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. 26.92 % विद्यार्थिनींनी होय असा प्रतिसाद दिला. रॅगिंग होत असल्यास कशा प्रकारे होते अशी विचारणा

करण्यात आली होती. या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद विद्यार्थिनींच्या शब्दात खालीलप्रमाणे –

1. एखाद्या मुलीच्या वैयक्तिक गोष्टीत उगाचच नाक खुपसणे.
2. चार मुलींनी एकत्र येवून टोमणे मारणे.
3. आर्थिकदृष्टया दुर्बल, शारीरिकदृष्टया कुरूप आणि बौध्दिक पातळी कमी असणा–या लाजाळू मुलींना रॅगिंगचा त्रास होतो.

अनेक भिन्न आर्थिक आणि सामाजिक स्तरातील विद्यार्थिनी वसतिगृहात एकत्र येतात. त्यांच्यातील संबंधात तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. वसतिगृहातील वातावरण शैक्षणिकदृष्टया पोषक असणे आवश्यक असते. शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी ठरते. या विद्यार्थिनी स्वतंःचे घर सोडून आलेल्या असतात. त्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण, भावनिक स्थर्य मिळणे आवश्यक असते.

90% विद्यार्थिनींना घरापासून दूर राहिल्याने घराची आठवण अस्वस्थ करते. नव्याने रहायला आल्यानंतर घराची आठवण अस्वस्थ करायची तथापि आता वसतिगृहाच्या वातावरणाची सवय झाली असा प्रतिसाद 10% विद्यार्थिनींनी दिला. वसतिगृहातील विद्यार्थिनींना अस्वस्थ वाटण्याची कारणे खालीलप्रमाणे –

1. घरातील माणसांची ओढ.
2. वेगळी भाषा.
3. वेगळी संस्कृती.
4. जेवणाचे वेगळे पदार्थ.
5. सणादिवशी घरी जाता येत नाही.

शिक्षण काळातील विद्यार्थिनींना वसतिगृह हे आपले घर आहे. असा अनुभव येणे आवश्यक आहे. अशावेळी मेट्रननी घरातील वडिलधा–या माणसांची/कुटुंबप्रमुखांची भूमिका वठविली पाहिजे.

मुलींनी वसतिगृहात रहाणे योग्य आहे असे 87 % विद्यार्थिनींना वाटते त्याची कारणे खालीलप्रमाणे –

1. मुली स्वावलंबी होतात.
2. श्रम प्रतिष्ठा वाढीला लागते.
3. सर्व धर्म समभावाचा दृष्टीकोन निर्माण होतो.
4. मुलींचा आत्मविश्वास वाढतो.
5. वसतिगृहात राहिल्याने अभ्यास अधिक होतो.
6. ओळखी वाढतात तसेच आपल्यातील दोष लक्षात येतात.
7. मुली सहनशील बनतात मुख्य म्हणजे मुली एकत्र कुटुंबात राहण्यास तयार होतात.
8. समायोजन करण्याची भावना वाढीला लागते.
9. समाजात वावरण्याचा धडा मिळतो.
10. घरातील माणसांचे प्रेम व महत्व वाढते.
11. मुली धीट होतात. मदत करण्याची भावना वाढते.
12. बाहेरच्या जगाशी चांगली ओळख होते.
13. जीवन म्हणजे तडजोड हे कळते.
14. मुली स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायला शिकतात.
15. निर्णय घेण्याची क्षमता वाढते. प्रतिकुल परिस्थितीला तोंड देता येते.
16. स्वतःची जबाबदारी समजते.
17. वसतिगृहात राहल्यामुळे आपल्यातील अहमपणाची भावना नाहीशी होते व आपला स्वभाव बदलण्याची संधी मिळते.
18. सहकार्याची, मदत करण्याची भावना निर्माण होते.
19. अनुवभवातुन शहणपण येते.
20. शिक्षणाची संधी उपलब्ध होते.

उपरोक्त प्रतिसाद पाहता अधिक्षिकांची जबाबदारी वाढते. आपली अडचण सोडविण्यासाठी इतरांकडे मदत कशी मागावी याचे ज्ञान विद्यार्थिनींना द्यावे. संभाषण कौशल्य,

आपली मते इतरांसमोर मांडण्याचे धाडस विद्यार्थिनींमध्ये निर्माण व्हावे यासाठी इष्ट ते उपक्रम वसतिगृहात आयोजित करावेत. वसतिगृहे ही संस्कार केंद्रे बनावित.

13% मुलीनी वसतिगृहात राहणे अयोग्य आहे असा प्रतिसाद दिला. मुलींनी वसतिगृहात राहणे अयोग्य आहे असे वाटण्याची कारणे –

1. मुली उर्मट होतात.
2. मुलींच्यामध्ये स्वैराचार निर्माण होतो.
3. मुलींनी घर सोडून राहणे सुरक्षिततेच्यादृष्टीने धोकादायक आहे.
4. मुलींना घराविषयी आस्था राहत नाही.
5. मुलींचा दंगा करण्यात बराच वेळ जातो.
6. इतर मुलींच्या संगतीचा वाईट परिणाम होवू शकतो.

विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेण्याच्या ध्येयाने वसतिगृहात आले असतात. याचे त्यांना विस्मरण होता कामा नये. बेजबाबदार वर्तन असलेल्या विद्यार्थिनींना पर्यवेक्षकांनी तसेच अन्य विद्यार्थिनींनी समज द्यावी. वसतिगृहातील विद्यार्थिनींमध्ये सलोख्याचे वातावरण कसे राहील या दृष्टीने अधिक्षिकांनी प्रयत्नशिल रहावे. वेळोवेळी उद्‌बोधक चर्चा घडवून आणावी. मुलींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होईल. उच्च शिक्षित महिला या राष्ट्राचे भूषण आहेत. म्हणून शासकीय अनुदानातुन गावोगावी मुलींच्यासाठी वसतिगृहे सुरू व्हावीत.

## शिफारशी :–

1. व्यवस्थापनाने गैरवर्तन करणा–या विद्यार्थिनींवर कडक निर्बंध घालावेत.
2. विद्यार्थिनीला वसतिगृहात समवयस्कांचा सहवास मिळतो पण हा सहवास नेहमीच हितकारक असेल असे नाही. वसतिगृहाला नियमांची सर्वसाधारण चौकट आवश्यक असते. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाने विद्यार्थिनींच्यावर सुसंस्कार होतील असे उपक्रम आखले पाहिजेत.
3. व्यवस्थापनाने विद्यार्थिनींच्या भौतिक सुविधांबाबत असणा–या अडचणी जाणून घेऊन दूर कराव्यात.

4. स्वच्छ परिसरासाठी व्यवस्थापनाने मोहिम हानी घ्यावी. विद्यार्थिनींना या मोहिमेत सहभागी करफन घेतल्यास श्रमप्रतिष्ठा वाढीस लागेल.
5. विद्यार्थिनींना स्वातंत्र देण्याबाबत अधिक्षिकांनी तारतम्याने निर्णय घ्यावेत.
6. वसतिगृहाच्या इमारती बांधताना प्रशस्त व हवेशीर जागी बांधण्यात याव्यात.
7. अधिक्षिकांची नेमणूक करताना त्या कर्तव्य कठोर असल्या तरी विद्यार्थिनींच्याविषयी सहानुभूती आणि आपुलकी असेल अषा अधिक्षिकांची नेमणूक व्हावी.

## संदर्भ :–

1. उपासती ना.के. : शैक्षणिक कृतिसंशोधन स्वरूप, साधने व कार्यपध्दती, (पुणे महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ) 1972
2. John W. Best and Jemes V. Khan, 'Research in Education, (7th Edition, New Delhi, Prentice Hall of India) 1996